# कुंभ कालावधी करिता खाजगी वाहनतळ (Parking) अर्ज

**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक**

**अटी, शर्थी, सुचनांकरीता, अभिव्यक्ती स्वारस्य या संबंधाने खालील पीडीएफ अर्जदार यांनी प्रथम अवलोकन करावे.**

नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा 2026-27 करीता नाशिक व त्र्यंबक शहरास भेट देणाऱ्या भाविकांच्या वाहनांकरीता वाहनतळ उभारण्याची कारवाई प्रस्तावीत आहे. अशा वाहनतळांच्या उभारणीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता, प्राधिकरणाने, नाशिक व त्र्यंबक शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या लगत, उपयोगीतता लक्षात घेत, खाजगी, इच्छुक, जमीनमालकांकडून आणि पात्र संस्थांकडून खाजगी तत्वावर वाहनतळे उभारण्यासाठी स्वारस्याची चाचपणी करण्याकरीता, प्राथमिक माहिती मागवीण्याचे धोरण आखले आहे.

खाजगी, इच्छुक, जमीनमालक, जे स्वतःच्या खर्चाने त्यांच्या जमिनीवर वाहनतळ सुविधांचा विकास, संचालन आणि देखभाल करण्यास इच्छुक आहेत अशांच्या, प्रस्तावित जागांना NTKMA द्वारे स्थान, प्रवेशयोग्यता, जमिनीची उपलब्धता, वाहतूक व्यवस्थापनाच्या गरजा, सुरक्षा आणि कुंभमेळा 2027 साठीची एकूण उपयुक्तता या आधारावर मान्यता देण्याचे नियोजीत आहे. त्यासाठी अभिव्यक्ती स्वारस्य (EoI) मागविण्यात येत आहे.

प्रस्तुत अभिव्यक्ति स्वारस्य (EoI) म्हणजे कोणताही औपचारिक प्रस्ताव (offer) नाही आणि तो कोणत्याही वचनबद्धतेशिवाय जारी केला जात आहे. कोणत्याही टप्प्यावर EoI मागे घेण्याचा किंवा त्यातील कोणताही भाग बदलण्याचा अधिकार NTKMA राखून ठेवते. तसेच, आवश्यक वाटल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही अर्जदारास अपात्र ठरवण्याचा अधिकारही NTKMA राखून ठेवते.

अर्जदारांनी केवळ एकच अर्ज आणि एकदाच सादर करावा. अर्ज इंग्रजी, किंवा मराठी या कोणत्याही एका भाषेत, ऑनलाईन माध्यमातून सादर करता येईल. एकापेक्षा अधिक अर्ज अथवा एकाहून अधिक माध्यमांतून केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत: १६ नोव्हेंबर २०२६ (कार्यालयीन वेळ संपेपर्यंत)**